# सेवा व सेवासाधने

काय मित्रांनो , विषय ओळखीचा वाटतोय का ? शक्यता जरा कमीच आहे. आजच्या यंत्रयुगात शब्दांचा विचार करायला वेळच कोठे आहे ? आपण सर्वजण जन्मापासून कशाचा तरी पाठलाग करत असतो व आपण कसे स्वयंपूर्ण आहोत ह्याच मस्तीत जगत असतो. खरे तर हा विषय सुचण्याला कारणही तसेच झाले. पण सध्या कारण आपण बाजूला ठेवूया. ते कारण मी ह्या लेखाच्या शेवटी सांगणारच आहे.

लहानपणापासून सर्वांच्या सेवेवर आपण मोठे होतो. हे सर्व जण आपल्या फारच जवळचे लोक असतात. आई , वडिल , भाऊ , गुरूजन वगैरे. हे सर्वजण कर्तव्यच करत असतात. आपल्याला मात्र खूप मोठे (अर्थात विचाराने) होईपर्यंत ह्याचा मागमूस नसतो. मोठे झाल्यावर जेव्हा कधी सेवा मिळण्यात अडचणी येतात तेव्हा आपण चिडतो , रागावतो पण आपल्या मनात असा विचार येत नाही कि जेव्हा आपण लोकांना सेवा देण्यास कुचराई करतो तेव्हा इतर लोकही आपल्यावर चिडत असतील असो.

सेवेबरोबरच आपण सेवासाधनांचा उपयोग करत असतो. खरे तर सेवा साधनांचा शोध म्हणजे माणसाने बुद्धिमतेची परिक्षा पास झाल्याची पावतीच.

एका लहानशा उदाहरणानी मी तुम्हाला सेवा व सेवासाधनांची मालीका सांगतो. आपणा सर्वांनाच सकाळी उठल्यानंतर चहा लागतो.खरेतर चहा बनवायला ५ मिनीटेच लागतात. घटकपण कमी - उदा. पाणी , साखर , चहा व दूध व गॅस (इंधन) मित्रांनो पण तुम्ही कधी एकेका घटकाचा विचार केला आहात का ? उदा. चहा , चहाचे पीक आसाम , दार्जिलिंग वगैरे ठिकाणी घेतात. चहाची पाने खुडून , कारखान्यात त्यावर प्रक्रीया होऊन बाजारात चहा विकायला येतो. साखर बनविण्यासाठी सुद्धा खूप मोठी यंत्रणा लागते. तीच गोष्ट दूधाची. दूध गावातून गोळा करून प्रक्रीया करून आपल्या घरी पिशवीतून मिळते. जे पाणी नळातून येते ते कितीतरी मैलांवरून पाईपच्या साह्याने धरणातून , शुद्ध करून आपल्याला मिळते. गॅसची अशीच कहाणी. थोडक्यात म्हणजे आपण ह्या संपूर्ण साखळीचा विचार करतच नाही. किती लोकांचे श्रम ह्यासाठी खर्ची पडतात. केवळ पैसे टाकून ह्या वस्तु आपण बाजारातून आणतो व सकाळी चहा पिऊन दिवसाची सुरवात करतो.

ह्या साखळीपैकी १ गोष्ट जरी बिनसली तरी आपला दिवस खराब जातो.
आपण थोडे सेवासाधनांसंबंधी.आज केवळ ह्या सेवासाधनांमुळेच आपण आपली रोजची कामे विनाश्रम व कमी वेळात करून नोकरी , व्यवसाय , शिक्षण करू शकतो.

लहानपणापासून ह्या सेवासाधनांची आपल्याला संगत असते त्यामुळे आपण ह्या साधनांचा गांर्भीयाने विचार करत नाही. किती उदाहरणे देऊ. बल्ब , गॅस , गिझर , स्वयंपाकाची उपकरणे , मोबाईल , कॅलक्युलेटर , फोन , कॉम्पुटर , फॅक्स , कार , वाहन. ही जंत्री कितीही लांबवर जाऊ शकते. आता मी वेगळयाच विषयाला हात घालणार आहे. सेवा देणारे व सेवासाधने याचा विचार केला तर आपली सहजप्रवृत्ती असते कि आपण सेवा देणा–याला ग्राह्य धरतो तर सेवासाधनांची पूर्ण काळजी करतो.

काय मित्रांनो ? काही तथ्य वाटतेय का माझ्या बोलण्यात ?

आज आपण सर्वांनी लहानपणापासून त्यांनी आपल्याला सेवा पुरवली (मग तो त्यांच्या कर्तव्याचा भाग असो किंवा त्यांच्या व्यवसायाचा) अशा लोकांची जंत्री केली पाहिजे. त्याचबरोबर आपण कोणाकोणाला सेवा पुरवतो व ज्या सेवा दर्जाची आपण इतरांकडून अपेक्षा करतो तो दर्जा आपण राखतो का ह्या प्रश्नाचे पण उत्तर शोधले पाहिजे. ही तुलनाच तुम्हाला पुढील वाटचालीसाठी मार्ग दाखविल.

आपण सेवासाधनांची पूरेपुर काळजी घेतो. त्यांची नियमित देखभाल , दुरूस्ती करतो. कारण जर सेवासाधने बरोबर काम करत नसतील तर आपले काम अडेल व त्याची आपल्याला सवयच नाही. कधी विचार केला आहे कि आपल्या लहानपणी कोठे होती इतक्या प्रमाणात सेवासाधने ? जस जसे सेवासाधनांचे आपल्या आयुष्यातील प्रमाण वाढत आहे त्या प्रमाणात आपली विचारसरणीपण बदलत आहे. आज रिमोट चा शोध लागल्यामुळे जागेवरून उठायला पण नको.

हीच तत्परसेवेची अपेक्षा आपण सेवा करणा-यांपासून ठेवतो. पण फरक इतकाच आहे कि सेवासाधन हे एक यंत्र आहे तर सेवाकर्मी एक माणूस आहे. ऑफीसात नोकरीचा भाग म्हणून आपल्या हाताखालील कर्मचारी आपल्याला मान देतात. आपण त्याच प्रमाणात त्यांना मान देतो का ? त्यांच्या कामाचे मोल करून शाबासकीची थाप त्यांच्या पाठीवर मारतो का ? शाबासकीची अपेक्षा आपण लहानपणापासून लहान सहान यशात केलीली असते व आजकालच्या कौतुकाच्या जमान्यात ब-याच प्रमाणात ती पुरी पण झालेली असते. असे असताना सुद्धा आपण मात्र कोणाला शाबासकी द्यायला हात पुढे करत नाही. शेवटी कर्मचारी एक माणूस आहे. एवढेही भान ब-याच वेळा ठेवले जात नाही. त्यांच्याही काही समस्या असतील , अडचणी असतील हे आपण विचारातच घेत नाही.

बरे जवळच्या लोकांना (जे आपल्याला सेवा देतात , ज्यांनी सेवा देऊन आपल्याला मोठे केले) आपण आपुलकीने वागवतो का ?

प्रत्येकाला लहानपणी आपले आईवडिल ग्रेट वाटतात. जसे आपण मोठे होतो , शाळा-कॉलेजात जाऊ लागतो तोपर्यंत आईवडिल आपले डोकेदुखी झालेले असतात. पुढे शिक्षण पूर्ण करून आपण नोकरी , व्यवसायात पडतो , कालांतराने लग्न करतो , बाप बनतो व जेव्हा आपल्या एकुलत्या एक मुलाचे किंवा मुलीचे पालनपोषण करताना ज्या अडचणी येतात तेव्हा आपल्याला आश्चर्य वाटते की आपल्या वडिलांनी कसे आपल्याला व आपल्या भावंडांना लहानाचे मोठे केले. आपल्याला तर एक मूल मोठे करणे म्हणजे संकट वाटायला लागलेले असते. मग जेव्हा आयुष्याची संध्याकाळ येते तेव्हा आपली परत एकदा खात्री पटते कि आपले आईवडिल खरेच ग्रेट होते. पण त्या शोधाच्या दरम्यान ५० – ५५ वर्षाचा काळ लोटलेला असतो.

ह्या सर्व विवेचनावरून मित्रांनो काही गोष्टी आपण विचारात घेतल्या पाहिजेत. आपण जेवढे स्वयंपूर्ण समजतो तेव्हढे आपण स्वयंपूर्ण नसतो. ब-याच प्रमाणात आपण दुस-यांवर (सेवा देणारे) व सेवा साधनांवर अवलंबून असतो.
सेवा उच्च दर्जाची मिळावी अशी आपली दोघांकडूनही अपेक्षा असते. पण आपण त्या निकषाला उतरतो का ? हे मात्र पाहिले जात नाही.

आज आपण ज्या प्रमाणात सेवासाधनांची काळजी घेतो त्या प्रमाणातच सेवाकर्मीची पण काळजी घेणे आवश्यक आहे. आपल्या वागणुकीचे स्वतःच करा निरीक्षण व पहा काय दिसते ते ?

आयुष्य म्हणजे एक साखळी आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत एक मोठी साखळी आहे. त्या दरम्यान ब-याच लहान लहान साखळया असतात. त्या ओळखण्यात व आपणही त्या साखळीचा एक दुवा आहोत याचे भान सर्वस्वी ठेवले पाहिजे. आज सर्वांनीच वरीलप्रमाणे विचार केला तर जग किती शांततामय , मंगलमय होईल नाही ?

काय म्हणालात ? हा विषय कसा सुचला ते ? अरे हो ते तुम्हाला सांगायचे राहून गेले.
काल मी माझा कॉम्पुटर विकला. गेले ६ वर्षे माझ्या जीवनाच्या तो एक अविभाज्य भाग होता. ह्या ६ वर्षात त्याच्याकडून खूप सेवा मला मिळाली. मी सुद्धा त्याच्यावर खूप प्रेम केले. त्याची देखभाल केली. केवळ तंत्रज्ञान प्रगत झाल्यामुळे व माझ्या तंत्रज्ञानाकडून अपेक्षा वाढल्यामुळे मी नवीन कॉम्पुटर घेतला.
१९९२ साली कार विकतानाही मला असेच वाईट वाटले होते.

मित्रांनो तुम्ही म्हणालात काय हा माणूस ? निर्जीव वस्तु विकताना वाईट वाटण्यासारखे काय आहे ? मित्रांनो जरा आजूबाजूला नजर टाका. स्वतःवरचे प्रेम थोडे कमी केलेत तरी चालेल पण आपल्या सेवा साधनांवर प्रेम करा. कोण म्हणतं ती जीवंत नाहीत ? फक्त ती बोलू शकत नाहीत व त्यांना कामाची आज्ञा द्यावी लागते एवढेच. आपले शरीर म्हणजे सुद्धा एक मशीनच आहे.

बघा विचार करून ! मला खात्री आहे कि माझा मुद्दा तुम्हाला पटल्याशिवाय रहाणारच नाही.